NEWS PAPER CLIPINGS

Name of Newspaper: .....पुण्यनगरी.....

Dated : ....4....डिसेंबर २००९

नव्या जीवनाचा सर्जनशील वेध घेणे, हे मराठी साहित्यापुढील आव्हान

डॉ. नरेंद्र जाधव यांच्या प्रतिपादन

संजय रामगिरवार
चंद्रपूर, ४ डिसेंबर

नव्वदच्या दशकापासून समाजजीवनात फार फेरबदल होत आहेत. पुरोगामी विचारसरणीच्या चळवळीही आता प्रभावहीन होऊ लागल्या आहेत. कारण त्या सत्तेच्या दृष्टीने सोयीच्या झाल्या आहेत. त्या साऱ्या गुंतागुंतीच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची वेळ आली असताना, दुर्दैवाने मराठी सृजनशील साहित्याने हे वास्तव समजून घेतले नाही. नव्या सामाजिक वास्तवातून निर्माण झालेल्या हाका अद्याप ऐकून घेता आल्या नाहीत आणि म्हणूनच नवीन जीवनाकाराचा सर्जनशील वेध घेणे मराठी साहित्यापुढील मोठे आव्हान आहे, असे मी समजतो, असे प्रतिपादन ५९ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटक तथा सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज येथे केले.

चंद्रपूर येथील सर्वोदय शिक्षण मंडळाद्वारा संचालित सरदार पटेल महाविद्यालयातर्फे आयोजित ५९व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटन आज, सायंकाळी सरदार पटेल महाविद्यालयाच्या मनोहरभाई पटेल परिसरात थाटात पार पडले. ६ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध गांधीवादी विचारवंत न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी हे होते. याप्रसंगी मावळते संमेलनाध्यक्ष बाबासाहेब मुसळे, सुप्रसिद्ध लेखिका अरुणा ढेरे, स्वागताध्यक्ष शांताराम पोटदुखे, आमंत्रक डॉ. रवींद्र शोभणे, कार्याध्यक्ष मदन धनकर, वि. सा. संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, उपाध्यक्ष

दीप प्रज्वलित करताना न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी व डॉ. नरेंद्र जाधव

५९व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटन थाटा

वामन तेलंग, साहित्यिक विठ्ठल वाघ, सु
द्वादशीवार, डॉ. रमाकांत कोलते, संमेलन
मुख्य संयोजक प्राचार्य जे. ए. शेख, र
मामीडवार, प्राचार्य कीर्तीवर्धन दीक्षि
बाबासाहेब निंबाळकर प्रभृती उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषण पान ४ वर

जाधव पुढे म्हणाले, गतकाळात
आजही वैदर्भीय साहित्यिकांची दखल
घ्यावीच लागणार आहे. संयुक्त महाराष्ट्र
गौरवशाली परंपराही विदर्भाच्या लेखकांनी ज
आहे. महाराष्ट्राचे गुणगाण करणारी, गौ
वाढविणारी जी काही गाणी रचल्या गेलीत,
वैदर्भीय लेखकांनीच लिहिली आहे, य
आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. शिवाय वऱ्ह
व झाडीबोली साहित्यही येथून विविध रूपाने
आली आहे. विदर्भाच्या या भूमीवर
असलेल्या या संमेलनाची तीन ठळक वै
आहेत. एक, हे संमेलन (पान २ वर)

News Paper:- ~~[struck out]~~ चंद्रपूर दर्पण

Date:- 5 डिसेंबर, 2009

विदर्भ साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

साहित्यिकांची 'बांधिलकी' नव्हे तर 'सामीलकी' आवश्यक : संमेलनाध्यक्ष न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांचें प्रतिपादन

मंचावर संमेलनाध्यक्ष न्या. धर्माधिकारी, उद्घाटक डॉ. नरेंद्र जाधव व उपस्थित साहित्य रसिक

'मनुवादी संमेलन' म्हणणाऱ्यांना खुल्या चर्चेचे आव्हान!

आजचे कार्यक्रम

संपर्क साधा

गुप्तरोग

१००% गॅरंटेड इलाज

युनानी दवाखाना

9823498936

News Paper:- युवाराष्ट्र दर्शन

Date:- 5 डिसेंबर, 2009

पान क्र. १ वरून

दलित साहित्यामुळेच ....

संधी आहे. सांस्कृतिक वैविधता आहे. नवीन साहित्य जन्माला घालण्याची उर्मी आहे व त्यामुळे दलित साहित्य आणखी समृद्ध करण्याची संधी चालून आली आहे. बदलत्या राजकीय व सामाजिक वातावरणात नवीन लेखकांची जबाबदारी पटवून देताना ते म्हणाले, सामाजिक वास्तव, परिवर्तनवादी चळवळ, पुरोगामित्व या सर्व गोष्टी प्रभावहिन झाल्या आहेत. संधी साधू आणि हिताचे राजकारण फोफावत चालले आहे. साहित्यासाठी हे घातक आहे. त्यामुळे लेखकांनी आपल्या कक्षा रूंदावाव्यात. जेणेकरून वास्तववादी व आजच्या सामाजिक अभिसरणाला पोषण साहित्य निर्माण करता येईल. मराठी साहित्यात सामाजिक वास्तवाचे भान नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, वर्गीय उतरंड, सामाजिक वास्तव यासाठी मराठी लेखकांनी नवीन बदल स्वीकारणे आवश्यक आहे. नव्या वाटा ध्वनीत होताना दिसत नाही. नव्या व्यवस्थेतून तयार होणारी आव्हाने जोपर्यंत पेलली जाणार नाही, तोपर्यंत मराठी साहित्य समृद्ध होणार नाही. त्यामुळे उदात्त जीवन मुल्यांचा आविस्कार करा, मर्यादीत व सकुचित साहित्य ठेवू नका असे आव्हानही त्यांनी केले. त्यांनी आपल्या आगळ्यावेगळ्या शैलीत मराठी साहित्यातील उणिवांवर बोट ठेवले. मराठी अनुवादाचीच भाषा संमेलनाध्यक्ष न्यायमुर्ती धर्माधिकारी यांनी अध्यक्षीय भाषणात मराठी भाषेचा होत असलेला ऱ्हास यापासून तर आधुनिक चंगळवादावर प्रहार चढविला. ते म्हणाले, मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देण्यात आला आहे, पण आजची मराठी ही अनुवादाचीच भाषा बनली आहे. शिक्षणाची व शासकीय व्यवहाराची भाषा राहील की नाही, यापेक्षाही ती मातृभाषा म्हणून घरात तरी वावरेल की नाही असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. साहित्यीकांनी समाजातील सर्व विषय व विविध आव्हाने स्वीकारावीत. केवळ बांधिलकीने नव्हे तर 'सामीलकी'ने ते पार पाडावीत असे आवाहनही त्यांनी केले. विचारमंचावर प्रा. सुरेश द्वादशीवार, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, कार्याध्यक्ष प्राचार्य मदन धनकर, वामन तेलंग, रवींद्र शोभने, प्राचार्य विठ्ठल वाघ, रमेशचंद्र मामीडवार, बाबासाहेब निंबाळकर, प्राचार्य जे.ए. शेख, प्राचार्य डॉ. किर्तीवर्धन दीक्षित आदी उपस्थित होते. हे संमेलन ६ डिसेंबरपर्यंत चालणार आहे.

News Paper:- लोकमत
Date:- 6 डिसेंबर 2009

डॉ. आंबेडकरांचे विचार बदलत्या परिस्थितीतही मार्गदर्शक -डॉ. जाधव

अमरावती, ५ डिसेंबर / प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ओळख ही भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून असली तरी ते देशातील सर्वात शिक्षित अर्थतज्ज्ञ होते. विविध शास्त्रांचा त्यांनी अभ्यास केला होता. त्यांनी सामाजिक चळवळ उभारली. त्या चळवळीवरही त्यांनी अर्थतज्ज्ञ म्हणून प्रभाव टाकला. त्यांनी आर्थिक विषयावर लिहिलेले शोधनिबंध आणि संदर्भग्रंथ आजच्या परिस्थितीतही मार्गदर्शक ठरणारे आहेत, असे विचार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी शनिवारी येथे व्यक्त केले.

गोविंदाजी खोब्रागडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. कमल सिंह, प्र-कुलगुरू प्रा. जयंत देशपांडे, बीसीयुडीचे संचालक डॉ. शरद तनखीवाले, माजी शिक्षण सहसंचालक डॉ. बी. जी. खोब्रागडे प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार काळाच्या पुढे होते, त्यांनी एक सशक्त सामाजिक चळवळ उभी केली. निष्णात अर्थतज्ज्ञ म्हणून सामाजिक क्षेत्रासोबतच देशाच्या सर्वांगीण विकासाचा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे विचार आजच्या बदलत्या परिस्थितीतही



मार्गदर्शक ठरणारे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सावकारी संदर्भात, रुपयाचा उगम, विनिमय, जातिव्यवस्था आणि त्याचा अर्थव्यवस्थेवर पडणारा प्रभाव या विषयी अत्यंत मूलगामी असे विचार मांडले आहेत, ते आजही अभ्यासण्यासारखे आहेत, असे डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले.

डॉ. आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र समाजाला दिला. जोपर्यंत आपण आपली मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत आपल्या आयुष्याला आकार येऊ शकणार नाही. आपल्या आयुष्यावर अनेक गोष्टींचा प्रभाव पडत असतो, चांगल्या विचारांनीच योग्य दिशा मिळू शकते. देशाचे भवितव्य तरुण पिढीच्या हातात आहे, त्यांनी चांगल्या विचारांची कास धरणे आवश्यक आहे, असे डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले.

डॉ. नरेंद्र जाधव यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी जीवनासाठी आठ सूत्री कार्यक्रम सांगितला. विद्यार्थ्यांनी ध्येय मोठे ठेवायला हवे, प्रबळ इच्छाशक्ती हवी, कठोर परिश्रम घेण्याची तयारी हवी, वेळेचे अचूक व्यवस्थापन हवे, 'शॉर्टकट' नकोत, आई-वडिलांचे ऋण बाळगायला हवे, स्वयंनिर्णयाची क्षमता हवी, सामाजिकतेचे भान हवे आणि यश मिळवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत, असे डॉ. नरेंद्र जाधव यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. कमल सिंह यांनीही यावेळी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी विलास नांदूरकर यांनी केले. ■

News Paper:-...लोकसत्ता.....

Date:-.....5 डिसेंबर २००९..

दलित साहित्याने मराठी साहित्याला वैश्विक दृष्टी - डॉ. नरेंद्र जाधव

राजेश मडावी / ४ डिसेंबर

चंद्रपूर: दलित साहित्याने मराठी साहित्य समाजाभिमुख झाले. शोषित पीडित दबलेल्या वंचितांच्या मरणयातना हा दलित साहित्याचा मूलाधार असल्याने या साहित्यातील जीवनजाणिवा विश्वव्यापी ठरल्या, किंबहुना मराठी साहित्याला दलित साहित्याने वैश्विक दृष्टी प्रदान केली, असे प्रतिपादन प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व विचारवंत डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

आज ४ डिसेंबरला दुपारी चार वाजता विदर्भ साहित्य संमेलनाचे चंद्रपुरात थाटात उद्घाटन पार पडले. संमेलनाचे उद्घाटक म्हणून डॉ. जाधव बोलत होते. यावेळी मंचावर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी व लोकसाहित्याच्या अभ्यासिका डॉ. अरुणा ढेरे, साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष बाबाराव मुसळे, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, स्वागताध्यक्ष शांताराम पोटदुखे, विठ्ठल वाघ, प्राचार्य मदन धनकर, प्रा. सुरेश द्वादशीवार, प्राचार्य शेख,

५९ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

साहित्य संमेलनाचे दीप प्रज्वलनाने उद्घाटन करताना नरेंद्र जाधव.

निंबाळकर, डॉ. दीक्षित, रमेश मामीडवार उपस्थित होते. डॉ. जाधव आपल्या बालपणींच्या आठवणींना उजाळा देत म्हणाले, कुठल्याही क्षेत्रात कार्य करा मात्र ते कार्य उत्तुंग उंचीवर गेले पाहिजे, अशी शिकवण माझ्या वडिलांनी दिली होती. 'मी आणि माझा बाप' या आत्मकथनातून मी भोगलेले जीवन साहित्य रसिकांपुढे मांडले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये विदर्भातील लेखक कलावंतानी सर्वाधिक लेखन करून महाराष्ट्रावर अपार प्रेम व्यक्त केले.

साहित्य आणि राजकारण या दोन बाबींचा संबंध स्पष्ट करताना डॉ. जाधव म्हणाले, दलित साहित्यातून ज्या प्रामाणिक राजकीय संवेदना व्यक्त झाल्या त्याचा मूळ आशय आणि आजच्या परिवर्तनाच्या प्रभावहीन चळवळी बघून बरेच जण नाराजी व्यक्त करतात; परंतु या चळवळी आता संधीसाधू होऊ लागल्या आहेत. आजच्या प्रतिभावंतापुढे हेच खरे आव्हान आहे, असे सांगून डॉ. जाधव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिल्यानंतर जी अपेक्षा व्यक्त केली, तीच परिवर्तनाची, उजेडाची परंपरा आजच्या साहित्यिकांनी पुढे न्यावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संमेलनाचे अध्यक्ष न्यायमूर्ती धर्माधिकारी म्हणाले, महाराष्ट्र जसा संतांनी घडवला तसाच तो साहित्यिकांनीही घडविला आहे. त्या दृष्टीने लोकशाही प्रक्रियेत साहित्यिकांचे काय कर्तव्य आहे, याचा विचार करावा लागेल. साहित्य कसे असावे याविषयी ते 'कशाचे असावे' यावरच अधिक भर दिला कारण तेच वैदर्भीय साहित्यिकांनी केले.

प्रारंभिक साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष बाबाराव मुसळे यांनी संमेलनाचे सूत्रे नवे अध्यक्ष न्यायमूर्ती धर्माधिकारी यांना सुपूर्द केली. प्रास्ताविक प्राचार्य मदन धनकर यांनी केले. यावेळी आमंत्रक डॉ. रवींद्र शोभणे, स्वागताध्यक्ष शांताराम पोटदुखे, डॉ. अरुणा ढेरे, मनोहर म्हैसाळकर, विठ्ठल वाघ यांनी विचार व्यक्त केले. डॉ. जाधव यांच्या हस्ते 'शामरंग' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. ६ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या संमेलनात विदर्भातील नामवंत लेखक या साहित्यमांदियाळीत सहभागी झाले आहेत.

News Paper:- ~~लोकमत~~ सुवार्ता दर्शन

Date:- ५ डिसेंबर २००९

नागपूर शनिवार, दि. ५ डिसेंबर २००९ Postal Registration No. RNP/NPCity/329/2008-10 मुख्य संपादक - प्रकाश तागडे

दलित साहित्यामुळेच मराठी साहित्याला जागतिक दर्जा

प्रतिनिधी

चंद्रपूर, दि. ४ - मराठी साहित्य जागतिक स्तरावर पोहचविण्यामागे चार भिंतीतील लेखन नव्हे तर व्यथा वेदनांना मांडणाऱ्या दलित साहित्यातील जिवंतपणा मोलाचा ठरला असल्याने मराठी साहित्य जागतिक झाले आहे, असे प्रस्तापित साहित्यीकांच्या डोळ्यात

डॉ. जाधव यांचे प्रतिपादन

झणझणीत अंजन घालणारे मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ तथा 'आमचा बाप व आम्ही' या जागतिक स्तरावरील विक्रीचा उच्चांक गाठलेल्या पुस्तकाचे लेखक डॉ. नरेंद्र जाधव यांनी मांडले.

येथील सरदार पटेल महाविद्यालयात आजपासून प्रारंभ झालेल्या राम शेवाळकर स्मृती समर्पित ५९ वे विदर्भ साहित्य

मार्गदर्शन करताना डॉ.नरेंद्र जाधव व उपस्थित मान्यवर (छाया.गोलू बारहाते,चंद्रपूर)

संमेलनाचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संमेलनाध्यक्ष न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, पूर्वाध्यक्ष बाबुराव मुसळे, सुप्रसिद्ध लेखिका अरूणा ढोरे, स्वागताध्यक्ष शांताराम पोटदूखे यांच्या उपस्थितीत त्यांनी संमेलनाचे उद्घाटन केले.

'आमचा बाप आणि आम्ही' या पुस्तकातील बापाच्या स्मृती जागवत डॉ. जाधव यांनी प्राचीन व अर्वाचिन मराठी साहित्याचा आढावा घेतला. ते पुढे म्हणाले, १९६० नंतर जन्मास आलेले दलित साहित्य खऱ्या अर्थाने साहित्य ठरले. अनेक आत्मकथातून विविधांगी लेखनासोबतच अंगाला झोंबणारे वास्तव समोर आले. सर्व सामान्य वंचितांच्या वेदना मराठी वाचकांना अनुभवता आल्या. या साहित्याचे विद्रोह आणि नकार हे वैशिष्ट ठरले. सामाजिक जाती व्यवस्थेतील दाहकतेला त्यात विरोध होता. गावकुसाबाहेरील दु:ख शब्द बद्ध करण्यासाठी लेखकांनी ताकद पणाला लावली व त्यामुळे आजचे मराठी साहित्य समाजाभिमूख झाले. आजच्या दलित चळवळीतील भांडणामुळे दलित साहित्य मृतप्राय ठरेल ही भीती दूर सारत ते म्हणाले, आजच्या जागतिकीकरणात वेगवेगळे आव्हाने उभी आहे. मात्र या आव्हानांमध्ये **उर्वरित पान २ वर....**

News Paper:- ~~चंद्रपूर वर्धा~~ महाविदर्भ

Date:- 5 डिसेंबर २००९

५९ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

चंद्रपूर (का.प्र.) आदिवासींना आजही दुय्यम नागरिकच नव्हे तर दुय्यम मानव च मानले जाते. त्यांच्या एकुण साहित्याची व सांस्कृतिक जीवनाचीही जेवढी दखल साहित्या क्षेत्राने घ्यावयास हवी होती तशी आजवर घेतली गेली नसल्याची खंत न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी येथे बोलतांना व्यक्त केली.

येथील सरदार पटेल कोलते, डॉ. रविंद्र शोभणे, महाविद्यालयाच्या प्रांगमात ५९ व्या बाबासाहेब निंबाळकर, रमेशपंत विदर्भ साहित्य संमेलनात आपल्या अध्यक्षीय भाषणातून ते बोलत होते. या संमेलनाचे उद्घाटन ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री शांताराम पोटदुखे, कार्याध्यक्ष प्राचार्य मदन धनकर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, अरूणा ढेरे, सुरेश द्वादशीवार, पूर्वाध्यक्ष बाबाराव मुसळे, वामन तेलंग, डॉ. रमाकांत मामीडवार, प्राचार्य डॉ. किर्तीवर्धन दीक्षित मुख्य संयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.ए. शेख प्रामुख्याने उपस्थित होते. हे साहित्य संमेलन प्राचार्य राम शेवाळकर यांच्या स्मृतीच अर्पण करण्यात आलेले आहे. पूर्वाध्यक्ष बाबाराव मुसळे यांनी आपली अध्यक्षपदाची सूत्रे न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचेकडे सुपूर्द केली.

यावेळी बोलतांना न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी पुढे म्हणाले की, नक्षलवाद अगर आदीबासींचे प्रश्न हे केवळ शांतता व सुव्यवस्थेचे प्रश्न नाहीत. ते सामाजिक अव्यवस्था व असमानता यांचेही प्रश्न असल्याचे न्या. धर्माधिकारी यांनी सांगितले. जंगली श्वापदांचा आवाज जंगलातील पक्षांचे गुणगुणे आणि फुलपाखरांचे बागडणे पाहता यावे हे माझे स्वप्न आहे. मात्र माझ्या मुलांना हे सर्व पाहता येईल की नाही, याबाबत मी शांशक असल्याचे

पान २ वर

आदिवासींच्या साहित्य जीवनाची दखल घेतल्या गेली नाही-न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांना खंत

मनुवादी साहित्य संमेलन -ॲड. पाटील

चंद्रपूर (का.प्र.)

विदर्भ साहित्याच्या नावाखाली विदर्भाची अस्मिता, संत आणि परिवर्तनवादी महापुरूषांना पायदळी तुडविणाऱ्या संमेलनाचा आम्ही जाहिर निषेध करीत आहोत.

संमेलनाची पत्रिका ज्यांनी पाहिली असेल व वाचली असेल त्यात प्रकाशकाचे नाव नाही. त्यांच्या लक्षात येईल की, त्यात चंद्रपूर विदर्भ व महाराष्ट्रातील ज्वलंत

पान २ वर

संमेलनाला विरोध करून गालबोट लावू नये-पोटदुखे

चंद्रपूर शहरात सांस्कृतिक वातावरण तयार करून लोकांचे जीवन समृद्ध करण्याच्या उद्देशाने आम्ही ५९ वे विदर्भ साहित्य संमेलन या ठिकाणी घेत आहोत. हे संमेलन 'जनवादी' संमेलन नसून 'मनुवादी' अभिजनांचे संमेलन असल्याचे मत व्यक्त करून या संमेलनाला ॲड. भगवान पाटील यांनी विरोध दर्शविला आहे.

पान २ वर

व्यासपीठावर डावीकडून प्राचार्य धनकर, प्राचार्य निंबाळकर, प्रा. द्वादशीवार, डॉ. जाधव पोटदुखे न्या. धर्माधिकारी श्रीमती ढेरे, मिसाळ व म्हैसाळकर.

मोटारसायकल अपघातात १ ठार, १ गंभीर

वरोरा (वार्ता.) अपघातात अरविंद [illegible]

प्रथम पुण्यतिथी

News Paper:- सकाळ

Date:- ५ डिसेंबर २००९

विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटन

चंद्रपूर : आजपासून प्रारंभ झालेल्या ५९ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना डॉ. नरेंद्र जाधव. संमेलनाध्यक्ष न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, स्वागताध्यक्ष शांताराम पोटदुखे व मान्यवर.

'सामन्य माणूस' साहित्याचा विधाता व्हावा : न्या. धर्माधिकारी पान ९ वर ▶

दलित साहित्यामुळे मराठीला वैश्विक ओळख पान २ वर ▶

News Paper:- लोकमत

Date:- ५ डिसेंबर, २००९

नागपूर

तरुणाई देशाचे बलस्थान - डॉ.जाधव

नागपूर, दि.५ (प्रतिनिधी) - महासत्तेचे स्वप्न दिवास्वप्न ठरायचे नसेल तर शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करावा लागेल. सोबतच देशाचे बलस्थान असलेली तरुणाई अधिक सक्षम आणि प्रगत कशी होईल, याचे नियोजन करण्याची हीच खरी संधी असल्याचे प्रतिपादन केंद्रीय योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

शहरातील विविध सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांच्यावतीने डॉ.जाधव यांचा नागरी सत्कार शनिवारी डॉ.आंबेडकर महाविद्यालयात करण्यात आला. यावेळी 'सामाजिक व आर्थिक न्यायात उच्च शिक्षणाची भूमिका' या विषयावर ते बोलत होते.

डॉ.नरेंद्र जाधव यांचा सत्कार करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सचिव सदानंद फुलझेले. सोबत ना.डॉ.नितीन राऊत, कुलगुरू डॉ.वेदप्रकाश मिश्रा, डॉ.एस.एन.पठाण, डॉ.पंकज चांदे.

पशुविज्ञान, मत्स्य व दुग्धविकास मंत्री डॉ. नितीन राऊत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सचिव सदानंद फुलझेले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.श.नु.पठाण, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.पंकज चांदे, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण निनावे, दत्ता मेघे अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वेदप्रकाश मिश्रा, वनराईचे विश्वस्त गिरीश गांधी आणि नगरसेवक प्रकाश गजभिये यावेळी उपस्थित होते.

डॉ.जाधव म्हणाले, २०२० ला भारताचे सरासरी वयोमान २८ इतके असेल, त्या तुलनेत प्रगत देशाचे सरासरी वयोमान ३५ वर पोहोचणार आहे. आताच्या प्रगत देशांनी त्यांच्याकडील तरुणाईचा विकास करीत प्रगतीची कास धरली. ती संधी आता आपल्याकडे आहे. त्यामुळे महासत्तेचे ध्येय गाठण्यासाठी सध्या १२ टक्क्यावर असलेला उच्च शिक्षणाचा दर कसा वाढेल, यावर नियोजन करण्याची गरज आहे.

११ व्या पंचवार्षिक योजनेत याकडे कटाक्ष टाकण्यात आल्याचे जाधव यांनी सांगितले. पुस्तक आणि गाईड वाचून तीन तासाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना आयुष्याची परीक्षा पास करण्यासाठी काय देता येईल यावर लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमांची मांडणी करून त्याचा अधिकाधिक विद्यार्थ्यांना फायदा करून देण्यासाठी विद्यापीठांनी पुढे येण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

देशात रोजगार हमी योजनेची मुहूर्तमेढ रोवणारा महाराष्ट्र मात्र ही योजना राबविता कमी पडतो, याबद्दल डॉ.जाधव खंत व्यक्त केली.

नागपूर विद्यापीठाला केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा देण्यासाठी डॉ.जाधव यांनी प्रयत्न करावे, अशी विनंती कुलगुरू डॉ.पठाण यांनी यावेळी केली. डॉ.चांदे म्हणाले, तंत्रज्ञान आणि विज्ञानच्या बळावर देशाने महासत्तेकडे वाटचाल सुरू केली असली तरी भारतीय संस्कृती आणि तत्वज्ञानाच्या बळावर नेतृत्व करणे शक्य आहे. वित्त व लेखा अधिकारी पुरण मेश्राम यांनी प्रास्ताविकातून डॉ.जाधव यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. संचालन सहायक कुलसचिव अनिल हिरेखन यांनी केले.

Name of Newspaper: ..... लोकसत्ता .....

Dated : ..... ६ डिसेंबर २००९.

सामाजिक वास्तवाचे भान साहित्यिकांनी ठेवावे -डॉ. नरेंद्र जाधव

विदर्भ साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

राखी चव्हाण

मनोहरभाई पटेल परिसर, चंद्रपूर / ४ डिसेंबर

वर्गीय उतरंड, सामाजिक वास्तव, सामाजिक भान, सृजनशिलता हे जोपर्यंत मराठी साहित्य स्वीकारणार नाही आणि नव्या व्यवस्थेवर प्रहार करणारी आव्हाने पेलण्याची ताकद जोपर्यंत मराठी साहित्यात येणार नाही तोपर्यंत मराठी साहित्य समृद्ध होणार नाही. सामाजिक वास्तवाचे भान साहित्यिकांनी ठेवावे, असे प्रतिपादन संमेलनाचे उद्घाटक डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

सर्वोदय शिक्षण मंडळाच्यावतीने येथील सरदार पटेल महाविद्यालयात आयोजित विदर्भ साहित्य संघाच्या ५९ व्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व लेखक डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते थाटात झाले. यावेळी डॉ. राम शेवाळकर यांच्या प्रतिमेचे अनावरण नरेंद्र जाधवांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर संमेलनाचे अध्यक्ष न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, ज्येष्ठ लेखिका व कवयित्री अरुणा ढेरे, स्वागताध्यक्ष शांताराम पोटदुखे, पूर्व संमेलनाध्यक्ष बाबाराव मुसळे, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, संमेलनाचे कार्याध्यक्ष मदन धनकर, ज्येष्ठ पत्रकार व लेखक प्रा. सुरेश द्वादशीवार, विठ्ठल वाघ, डॉ. रवींद्र शोभणे, बाबासाहेब निंबाळकर, प्राचार्य डॉ. कीर्तीवर्धन दीक्षित, वामन तेलंग, प्राचार्य डॉ.जे.ए. शेख रमेश मामीडवार होते.

विदर्भ साहित्य संमेलनाला 'मनूवाद्यांचे संमेलन' या आरोपाने अंतकरणातून व्यथित झालो असून यावर जाहीर वादविवाद घेण्याची तयारी आहे, असे आव्हान माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री व स्वागताध्यक्ष शांताराम पोटदुखे यांनी या संमेलनावर टीका करणाऱ्या ॲड. भगवान पाटील यांना व्यासपीठावरून दिले. ॲड. पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन या संमेलनावर टीका केली होती. शांताराम पोटदुखे यांनी स्वागतपर भाषणात या संमेलनात सर्वांनाच सहभागी करून घेतल्याचे सांगतानाच ॲड. पाटील यांनी एक आदर्श संमेलन करून दाखवावे, आम्ही हसत हसत त्यांना मदत करू, त्यांचा आरोप हा अत्यंत खालच्या पातळीवरचा असल्याचे सांगितले. शहरातील सांस्कृतिक वातावरण चांगले असताना ॲड. पाटील टीका करून वाईट परंपरेला जन्म देत आहेत. शहरातील सांस्कृतिक जीवन खराब करत आहेत असेही ते म्हणाले. ॲड. पाटील यांनी केलेल्या आरोपावर याच ठिकाणी जाहीर वादविवाद घेण्यासही तयार असल्याचे पोटदुखे म्हणाले.

संमेलनाचे उद्घाटन करताना डॉ. नरेंद्र जाधव. शेजारी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, अरुणा ढेरे, शांताराम पोटदुखे (मागे), मनोहर म्हैसाळकर, प्रा. जी.ए. शेख व रमेश मामीडवार.

■ संमेलनाध्यक्षांचे भाषण
■ शिस्तबद्ध संचालनात निघाली ग्रंथदिंडी... पान २ वर

मराठी बाणा जपण्याचे काम वैदर्भीय साहित्यिकांनी केले आहे. मराठी साहित्यात त्यांचे भरघोस योगदान आहे हे सांगताना डॉ. नरेंद्र जाधव यांनी, महाराष्ट्र या संकल्पनेवर आधारित कविता व गाणी वैदर्भीय साहित्यिकांनी रचली आहेत याची आठवण करून दिली. संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हे संमेलन होत आहे. निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या प्रदेशात रसिकांचा सन्मान होत आहे आणि ज्या व्यक्तीच्या वक्तृत्वावर पुस्तक लिहिल्या गेले त्या एकमेवाद्वितीय राम शेवाळकरांना हे संमेलन समर्पित करण्यात आले आहे, हे या संमेलनाचे

पान ४ वर

News Paper:-...पुण्यनगरी.....

Date:-....६..डिसेंबर-२००९

'गँगस्टर' बनण्याची इच्छा होती - डॉ. नरेंद्र जाधव

नागपूर, दि. ५ (प्रतिनिधी) - माझ्या वडिलाने मला तू डॉक्टर, इंजिनिअर किंवा तत्त्वज्ञानी हो असा कधीही आग्रह धरला नाही; मात्र जो कोणी होशील तो 'टॉप वन' हो, असा मंत्र दिला होता. माझ्या अशिक्षित रांगड्या वडिलांकडून मिळालेले हे तत्त्वज्ञान जगातील कोणत्याही विद्वान प्राध्यापकांकडून आजपर्यंत मिळाले नाही. मुंबईच्या झोपडपट्टीत बालपण गेलं. तेथील वातावरणात वाढताना कधीही एखाद्या विद्यापीठाचा कुलगुरू किंवा नियोजन आयोगाचा सदस्य बनण्याची मनात कल्पना आली नाही, तर आपली पहिली इच्छा ही गँगस्टर बनण्याची होती, असा रहस्यात्मक उलगडा भारत सरकारच्या नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी शनिवारी केला.

नागपुरातील सामाजिक व सांस्कृतिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील सभागृहात आयोजित डॉ. नरेंद्र जाधव यांचा नागरी सत्कार व व्याख्यान

समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे पशुविज्ञान, मत्स्य, दुग्ध व्यवसायमंत्री डॉ. नितीन राऊत होते. तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. श. नु. पठाण, दत्ता मेघे अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वेदप्रकाश मिश्रा, कवी कुलगुरू संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंकज चांदे, पशुविज्ञान व मत्स्यसंवर्धन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. निनावे, सामाजिक कार्यकर्ते गिरीश गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सचिव सदानंद फुलझले, नगरसेवक प्रकाश गजभिये व नागपूर विद्यापीठाचे वित्त अधिकारी पुरण मेश्राम प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, व्यासपीठावर चार वेगवेगळ्या विद्यापीठाचे कुलगुरू तथा एक पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू म्हणून स्वत: डॉ. नरेंद्र जाधव उपस्थित होते. याप्रसंगी ना. राऊत यांच्या हस्ते डॉ. जाधव यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना, डॉ. नरेंद्र जाधव यांनी हा सत्कार आपण डॉ. जाधव यांचा म्हणून नव्हे, तर आंबेडकर चळवळीचा म्हणून स्वीकारत असल्याचे सांगितले. प्रास्ताविक डॉ. पुरण मेश्राम यांनी केले. तर संचालन साहाय्यक कुलसचिव अनिल हिरेकन यांनी केले.

News Paper:- सकाळ

Date:- ६ डिसेंबर २००९

युवाशक्तीच देशाचे बलस्थान

डॉ. नरेंद्र जाधव : युवाशक्तीला योग्य शिक्षण, प्रशिक्षणाची गरज

नागपूर, ता. ५ : जागतिक महासत्ता होण्याची संधी भारताला आहे. या संधीचं बलस्थान युवाशक्ती आहे. आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न दिवास्वप्न ठरू नये यासाठी देशातील युवाशक्तीला आतंरराष्ट्रीय पातळीवरील योग्य शिक्षण आणि प्रशिक्षणाची गरज असल्याचे प्रतिपादन नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज केले.

नागपुरातील विविध सामाजिक, सांस्कृतिक संघटनांच्या वतीने दीक्षाभूमीवरील ॲड. ना. ह. कुंभारे सभागृहात डॉ. नरेंद्र जाधव यांचा नागरी सत्कार आयोजित करण्यात आला. राज्याचे पशुविज्ञान, मत्स्य व दुग्धविकास मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते बुद्धमूर्ती, शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी दत्ता मेघे विज्ञान अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वेदप्रकाश मिश्रा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंकज चांदे, पशुवैद्यकीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण निनावे यांनीही डॉ. जाधव यांचा विद्यापीठाच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. वनराईचे विश्वस्त गिरीश गांधी, नगरसेवक प्रकाश गजभिये व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी डॉ. जाधव यांनी जगातील प्रगत देश आणि भारत यांच्यातील शिक्षण आणि प्रशिक्षणाची तुलनात्मक आकडेवारी सांगितली. विकसित देशात ६० ते ७० टक्के उच्चशिक्षणाचे प्रमाण असताना भारत देश केवळ १२ टक्क्यांवर थांबला आहे. ११ व्या योजनेत हे प्रमाण १८ तर १२ व्या योजनेतून हे प्रमाण २० टक्क्यांवर नेण्यासाठी प्रयत्न होत असल्याची माहिती त्यांनी दिली. उच्चशिक्षणासोबतच औपचारिक आणि अनौपचारिक प्रशिक्षणाची टक्केवारी केवळ १० टक्के असल्याचा गौप्यस्फोट त्यांनी केला. जगाच्या तुलनेत आपण मागे आहोत. याप्रंसगी डॉ. जाधव यांनी आयुष्यातील अनेक प्रसंगांनाही उजाळा दिला. पेशवाई असलेल्या पुण्यात एकेकाळी गव्व्यात गाडगे आणि कमरेला झाडू अशा अवस्था होंती, त्या पुण्यात विद्यापीठाचा कुलगुरू होण्याची संधी आली, त्यावेळी अफगाणिस्तान येथील कोटी रुपये पगाराची नोकरी सोडल्याचं दुःख झालं नाही. तर विद्येच्या माहेरघरी उच्च स्थान मिळाल्यानं समाजाचे स्थान उंचावेल, असेही त्यांनी सांगितले. कुलगुरू बनल्यानंतर समाज आणि शिक्षण यांच्यातील विसंवाद दूर करण्यांचं मोठं काम केल्याचं समाधान लाभलं. आपल्याला मिळालेली दूरदृष्टी बाबासाहेबांच्या प्रेरणेतून मिळाल्याचे त्यांनी वारंवार सांगितले. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी डॉ. नरेंद्र जाधव यांची नियोजन आगोगावरील नियुक्ती म्हणजे भारतीय संविधानाच्या संस्कृतीतून कल्याणाचे धोरण राबवणारे हस्ताक्षर ठरणार असल्याचे सांगितले. गिरीश गांधी म्हणाले, सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शोषित, उपेक्षित आणि सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी त्यांची नियुक्ती आहे. त्यांच्या नजरेत सामान्य माणसाची प्रगती दिसत असल्याचे सांगितले.

डॉ. पंकज चांदे यांनी भाषा आणि भारतीय तत्त्वज्ञान यांचा सहभाग देशाच्या नियोजनात व्हावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली. सदानंद फुलझेले यांनीही डॉ. जाधव यांना शुभेच्छा दिल्या. डॉ. जाधव यांनी डॉ. आंबेडकर यांच्या स्मारकाचे दर्शन घेतले.

प्रास्ताविक विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी पुरण मेश्राम यांनी केले. स्वागतपर गीत सहायक कुलसचिव अनिल हिरेखन यांनी गायिले. संचालन सुलभा सिरसाठ यांनी केले. आभार संघदीप उके यांनी मानले.

NEWS PAPER CLIPINGS

Name of News paper : ..loksatta.....

Dated : ..6/12/09

शेतकरी आत्महत्यांवरील अहवालाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी- डॉ. नरेंद जाधव

अमरावती, दि. ५ (स्थानिक प्रतिनिधी) - राज्यातील शेतकरी आत्महत्यांवर आपण शासनाला अहवाल सादर केला असून शासनाने तो अहवाल स्विकार केला आहे, मात्र शासनाने त्या अहवालानुसार तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे मत योजना आयोगाचे सदस्य तथा पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज येथे व्यक्त केले.



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात आयोजित व्याख्यानमालेत व्याख्यान देण्यासाठी ते आज अमरावतीत आले होते. या कार्यक्रमानंतर डॉ. जाधव यांनी इलेक्टॉनिक्स माध्यामांशी वार्तालाप करताना केला. त्यावेळी ते बोलत होते. शासनाच्या सूचनेनुसार आपण शेतकरी आत्महत्यांनर अहवाल तयार केला. या अहवालात अनेक चांगल्या गोष्टीत आहेत, ज्यांची अमंलबजावणी हव्या तेवढ्या लवकर व अत्यंत प्रभावीरित्या होण्याची गरज आहे. मात्र हा अहवाल शासनाने स्विकार केल्यावरही त्यांची अमंलबजावणी पाहिजे त्या गतीने होत नसल्याचे दिसत आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. या अहवालात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या ४ लाख ३४ हजार मुलांना शिक्षण देण्याची तरतुद आहे, मात्र त्यांची अद्यापही अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे ते म्हणाले.

शेतकऱ्यांसाठी युनोने दिलेल्या पॅकेजवर मात्र त्यांनी काही बोलण्यास नकार दिला.

NEWS PAPER CLIPINGS

Name of News paper : ..Maharashtra.. Vaibhav

Dated : 15/12/2009

भारत सरकारच्या नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव कोल्हापूर दौऱ्यावर आले असताना सायंदैनिक महाराष्ट्र वैभवच्या वतीने स्वागत करताना संपादक श्री. मोहन मुल्हेरकर, मुख्य कार्यकारी संपादक संजय पवार (छाया : राजेश काशीकर)

NEWS PAPER CLIPINGS

Name of News paper : Lok Sattta

Dated : December 4, 2009

सामाजिक वास्तवाचे भान साहित्यिकांनी ठेवावे -डॉ. नरेंद्र जाधव

पान १ वरून ➤ वेगळेपण आहे, असे डॉ. जाधव म्हणाले.

गतकाळातील वैदर्भीय साहित्यिकांच्या योगदानाचा दाखला देतानाच डॉ. जाधवांनी ६०च्या दशकानंतरच्या वैदर्भीय साहित्यिकांची दखल घेणे गरजेचे आहे, असे सांगितले. मराठी साहित्याला वैश्विक करण्यात दलित साहित्याचे फार मौठे योगदानँ आहे पण, त्याचवेळी झाडीपट्टीतील साहित्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याची खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. वेगाने बदलत जाणाऱ्या सामाजिक वास्तवाचे भान साहित्यिकांनी ठेवावे आणि नवी आव्हाने स्वीकारावी, असा सल्ला डॉ. नरेंद्र जाधवांनी यावेळी दिला.

डॉ. नरेंद्र जाधवांनी त्यांच्या भाषणातून मांडलेली नव्या जागतिकीकरणाची सूत्रे पुढे नेताना अरुणा ढेरे यांनी अलिकडच्या काही वर्षात घडून आलेल्या घडामोडींमुळे सर्वच संभ्रमात पडले, असे सांगून इतिहासाचा पाडाव सगळीकडेच झाल्याचे स्पष्ट केले. शेकडो बोली, शेकडो भाषा नाहिशा होत आहेत, अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. नव्या विश्व संस्कृतीत शहर, खेडे हे सर्वच समाविष्ट आहेत. जगाच्या बाजारपेठेचे मोठे ग्राहक सध्या आपण सर्वजण झालो आणि [illegible] ग्राहक हीच ओळख असणे हे चिंताजनक आहे. संस्कृतीचे झपाट्याने सपाटीकरण होत असून नव्या साहित्या घुढोल ते मोठे आव्हान असल्याचे अरुणा ढेरे म्हणाल्या. अभिजात साहित्य जेव्हा निःसत्व होत गेले तेव्हा लोकसाहित्याने नवे रस या साहित्याला घुरवले याची आठवण त्यांनी यावेळी करून दिली. लोक परंपरेतूनच अभिजात साहित्याचा जन्म झाला हे विसरून चालणार नाही, त्या म्हणाल्या.

साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवणे म्हणजे चिलोभनीय अनुभव आहे, असे सांगताना पूर्व संमेलनाध्यक्ष बाबाराव मुसळे यांनी लेखनावरील निष्ठा या अध्यक्षपदामुळे दृढ झाल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणावर प्रथमच परिसंवाद आयोजित करून या साहित्य संमेलनाने एक चांगली परंपरा निर्माण केल्याचे बाबाराव मुसळे म्हणाले. याप्रसंगी स्वागताध्यक्ष शांताराम पोटदुखे, डॉ. रवींद्र शोभणे यांनी मनोगत व्यक्त केले. संमेलनाच्या उद्घाटन समारंभात शांताराम पोटदुखे, डॉ. नरेंद्र जाधव, अरुणा ढेरे यांचा शाल, श्रीफळ, पुणेरी पगडी व ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी संमेलनाचे मावळते अध्यक्ष बाबाराव मुसळे यांनी डॉ. नरेंद्र जाधव यांना अध्यक्षपदाची सूत्रे प्रदान केली. उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक संमेलनाचे कार्याध्यक्ष प्रा. मदन धनकर यांनी केले. संचालन प्रा. पद्मरेखा धनकर व डॉ. राजलक्ष्मी कुळकर्णी यांनी केले. यावेळी आशुतोष शेवाळकर, प्राचार्य डॉ. कीर्तिवर्धन दीक्षित, प्राचार्य डॉ. अंजली हस्तक, प्राचार्य डॉ. सुनील साकुरे, प्राचार्य रमेशचंद्र मुनघाटे, डॉ. जया व्दादशीवार, बाबासाहेब निंबाळकर, प्रशांत पोटदुखे, रमेश मामीडवार, प्राचार्य वेरगुडे, प्रभू राजगडकर, डॉ. शरदचंद्र सालफळे, श्रीपाद प्रभाकर जोशी, राजा बोझावार, विलास बोझावार, व्ही.डी. मेश्राम, विनायक बांगडे, शुभदा फडणवीस, मेघना वाहोकार आदी साहित्य क्षेत्रातील मान्यवर मंडळी व साहित्य रसिक उपस्थित होते.

क्षणचित्रे

- तुतारी आणि शंखनादाने पाहुण्यांचे स्वागत झाले.
- पारंपरिक वेशभूषेत संमेलनस्थळाच्या स्वागतव्दाराजवळ पाहुण्यांना औक्षण करण्यात आले.
- नऊवारी आणि पारंपरिक साज व पांढरेशुभ्र कुर्तापायजमा, फेटे परिधान केलेले विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पाहुण्यांच्या स्वागतासाठी दुतर्फा उभे होते.
- सीमा मामीडवारांच्या संमेलनाला साजेशे लॅन्डस्केपींगने चांगली वातावरण निर्मिती केली
- संमेलनाला साहित्य रसिकांची भरगच्च उपस्थिती होती.
- आज सुमारे तासभर सुरू झालेल्या संमेलनाला तीनदा भारनियमनाचा फटका बसला.

साहित्य संमेलनात आज

सकाळी ९.३० वा. परिसंवाद - १ - विषय - प्राचार्य राम शेवाळकर : महाराष्ट्राचे सांस्कृतिक ऐक्य. अध्यक्ष- सुधाकर डोईफोडे. सूत्रसंचालक- प्राचार्य अजय कुलकर्णी. सहभाग - माधव सरपटवार, डॉ. म. रा. जोशी. डॉ. गोविंद देशपांडे, डॉ. सुभाष गढीकर, प्रा. दिलीप अलोणे

सकाळी ११.३०-परिसंवाद -२. विषय - अध्यक्षीय भाषणावर चर्चा. अध्यक्ष- डॉ. जया व्दादशीवार. सूत्रसंचालक - विनोद भालेराव. सहभाग - डॉ. श्रीकांत तिडके, प्रा. अनिल नितनवरे, डॉ. मृणालिनी बांडे, प्रा. पुरुषोत्तम माळोदे

दुपारी २ वाजता प्रकट मुलाखत. मुलाखत - डॉ. विठ्ठल वाघ. सूत्रसंचालक - राजा बोझावार. मुलाखतकार -वसंत वाहोकार. श्रीपाद प्रभाकर जोशी, डॉ. प्रमोद मुनघाटे.

दुपारी ४ वाजता कथाकथन. अध्यक्ष - डॉ. देवेंद्र पुनसे. सूत्रसंचालक - डॉ. इसादास भडके. सहभाग - अशोक पवार, नरेंद्र माहुरतळे, चंद्रशेखर वाडगावकर, ज्योती मोहन पुजारी

रात्री- ८.३० कविसंमेलन -२. अध्यक्ष - प्रभू राजगडकर . सूत्रसंचालक - तीर्थराज कापगते. सहभाग - प्रमोद अणेराव, अजय चिकाटे, प्रसेनजित गायकवाड, गिरीश सपाटे, गणेश भाकरे, अनिल जवंजाळ, प्र. ग. तळसरवार, सुनील कुमरे, विजयालक्ष्मी वानखेडे, देवेंद्र तातोडे, साधना तेलरांधे, सूरकर, ज्ञानेश्वर वांढरे, प्रमोद लेंडे, प्रकाश दुलेवाले, अनिल पुंडकर, आशीष देव, डॉ. विशाखा कांबळे, कविता डवरे, विजया मारोतकर, प्रकाश केळकर, मनोज पाठक.

News Paper:- लोकमत
Date:- ५ डिसेंबर २००९

५९ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

प्रतिनिधी

चंद्रपूर, दि. ४ - विदर्भ साहित्य संघाच्या ५९ व्या साहित्य संमेलनाचे आज शुक्रवारी सायंकाळी थाटात उद्घाटन झाले. विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या साहित्यीकांच्या मांदियाळीमुळे चंद्रपूर साहित्यमय झाले आहे. संमेलनाच्या उद्घाटनापूर्वी निघालेल्या ग्रंथदिंडीमुळे नगरी दुमदुमली.

सरदार पटेल महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या भव्य शामियान्यात तीन दिवशीय संमेलनाला प्रारंभ झाला. प्राचार्य राम शेवाळकर यांच्या स्मृतीला समर्पित या संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव याचे हस्ते उद्घाटन झाले. संमेलनाध्यक्ष न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, स्वागताध्यक्ष शांताराम पोटदूखे यांचे उपस्थितीत डॉ. जाधव यांनी दीप प्रज्वलित करून संमेलनाचे उद्घाटन केले. यावेळी न्यायमुर्ती धर्माधिकारी यांचे हस्ते प्राचार्य शेवाळकर यांच्या तैलचित्राचे अनावरण करण्यात आले. तर डॉ. जाधव यांचे हस्ते 'शामरंग' या स्मरणीकेचे प्रकाशन करण्यात आले.

तत्पूर्वी आज सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात आली. ग्रंथदिंडीचे पूजन संमेलनाध्यक्ष न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या हस्ते झाले. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री शांताराम पोटदुखे, विठ्ठल वाघ, मदन धनकर, रमेशपंत मामीडवार, राजा बोझावार, डॉ. सालफळे, यशवंत कुळकर्णी, डॉ. मंगेश गुलवाडे, प्राचार्य डॉ.जे.ए. शेख, प्राचार्य डॉ. अंजली हस्तक, प्राचार्य डॉ. सुनिल साकुरे, उपप्राचार्य एल.व्ही. शेंडे, डॉ. राजेश इंगोले, प्रा. देवराव खुटेमाटे, श्रीपाद प्रभाकर जोशी, प्रा. विमल गाडेकर, बंडोपंत बोढेकर, ग्रंथालयाचे संजय भूत्तमवार व त्यांची चमू व साहित्यीक प्रामुख्याने उपस्थित होते.

सकाळी महाविद्यालयातून निघालेली भव्य ग्रंथदिंडी चंद्रपूर नगरीतून गिरनार चौकमार्गे गांधी चौकातून जटपूरा गेटमार्गे वळण घेत कस्तुरबा मार्गे महाविद्यालयात येवून विसर्जित करण्यात आली. या ग्रंथदिंडीत भारतीय संविधान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र, श्री भावार्थ रामायण, ज्ञानेश्वरी, ग्रामगीता, सार्थश्री तुकारामाची गाथा, महात्मा ज्योतीबा फुले, आमचा बाप आणि आम्ही, लिळाचरित्र आणि महात्मा या महत्वपूर्ण पूस्तक व ग्रंथांचा समावेश होता. मराठमोळ्या नऊवारी पोषाखात असलेल्या विद्यार्थीनींनी डोक्यावर पूस्तकांचा संच ठेवलेला होता. या ग्रंथदिंडीत सरदार पटेल महाविद्यालय, समाजकार्य महाविद्यालय, विधी महाविद्यालय, न्यु इंग्लिश विद्यालय व लोकमान्य टिळक विद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या ग्रंथदिंडीत सहभागी लेझिम पथक, शंखनाद सर्वांचे लक्ष वेधित होते. या ग्रंथदिंडीदरम्यान महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आले. ग्रंथदिंडीचे संचालन पूतळ्यांना माल्यार्पण करण्यात मुकुंद उगे यांनी केले.

ग्रंथदिंडीने चंद्रपूरनगरी दुमदुमली

उद्घाटन करताना डॉ.नरेंद्र जाधव व मान्यवर

ग्रंथदिंडीत सहभागी साहित्यीक (छाया.गोलू बारहाते)

ॲड.पाटलांना शांताराम पोटदुखेंचे आव्हान

विदर्भ साहित्य संघाचे ५९ वे अधिवेशन मनुवादी असल्याची टीका करणाऱ्या ॲड. भगवान पाटील यांचेवर संमेलनाचे स्वागताध्यक्ष शांताराम पोटदूखे यांनी चांगलेच तोंडसुख घेतले. लोकांचे सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यासाठीच संमेलनाचे आयोजन अ हे. यात बहुजन किंवा मनुवाद नाही. मात्र ॲड. पाटील यांनी केलेली टीका सांस्कृतिक वैभव घाणेरडे करणारे आहे. त्यांचा आपणास राग नाही पण अशा खालच्या पातळीवर बोलण्यापेक्षा त्यांनी जाहीर वादविवाद स्पर्धा घ्यावी, त्यास आपण तयार आहोत.

त्याहीपुढे जावून त्यांनी एखादे संमेलन घ्यावे, संपूर्ण आर्थिक मदत आपण करू असे खुले आव्हान त्यांनी केले. त्यांच्या भाषणात अत्यंत उद्दामपणा दिसून येत होता. आपण आतापर्यंत खेदाने या सर्व घटनांकडे बघत असल्याचे त्यांनी संमेलनात स्वागताध्यक्षाची भूमिका मांडताना सांगितले. शांतारामजींच्या या आव्हानामुळे आता नवा वाद जन्माला येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

News Paper:-.....लोकसत्ता.....

Date:-.....६ डिसेंबर २००९.....

डॉ. नरेंद्र जाधव यांचा सत्कार करताना सदानंद फुलझेले, डॉ. नितीन राऊत, गिरीश गांधी.

उच्चशिक्षण-प्रशिक्षणासाठी मोठ्या गुंतवणुकीची गरज -डॉ. नरेंद्र जाधव

नागपूर, ५ डिसेंबर/ प्रतिनिधी

भारत जागतिक महाशक्ती बनणार, यात अजिबात शंका नाही परंतु, त्यासाठी ज्यांच्या भरवशावर देशाला महाशक्ती बनवायचे आहे त्या तरुण पिढीला उच्चशिक्षण आणि प्रशिक्षण देण्यासाठी विविध योजना राबवण्याची आणि त्यासाठी या क्षेत्रात मोठी गुंतवणूक होण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन योजना आयोगाचे सदस्य, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू, अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

डॉ. जाधव यांची योजना आयोगाचे सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल नागपुरातील विविध सांस्कृतिक व सामाजिक संघटनांच्या वतीने त्यांचा सत्कार व 'सामाजिक व आर्थिक न्यायात उच्चशिक्षणाची भूमिका' या विषयावर डॉ. आंबेडकर महाविद्यालयात आज त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

भारतातील १८ ते २३ या वयोगटातील एक मोठा समूह उच्चशिक्षणापासून वंचित आहे. देशात या तरुणांना उच्चशिक्षणाच्या केवळ १२ टक्के संधी उपलब्ध आहेत. अमेरिकेत तरुणांना ८३ टक्के तर, जगात तरुणांना सरासरी २३ टक्के उच्च शिक्षणाच्या संधी आहेत, अशी आकडेवारी सांगून ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, जमाती आणि अल्पसंख्यांक, महिला यांना उच्चशिक्षणाच्या केवळ २ टक्के संधी उपलब्ध असल्याची खंतही डॉ. जाधव यांनी व्यक्त केली.

याशिवाय, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणातही देश बराच मागे आहे. देशात औपचारिक व अनौपचारिक व्यावसायिक शिक्षणांच्या संधी केवळ १० टक्के आहेत. कोरियात हे प्रमाण तब्बल ७८ टक्के आहे. सर्व परिस्थिती बदलल्याशिवाय आणि तरुणांना योग्य शिक्षण व प्रशिक्षण दिल्याशिवाय भारताला महाशक्ती बनवणे दिवास्वप्न ठरू शकते. या क्षेत्रात बरेच करण्यासारखे आहे. योजना आयोगावर नियुक्ती झाल्याने ती संधी उपलब्ध झाली आहे, असेही डॉ. जाधव म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री डॉ. नितीन राऊत होते. याप्रसंगी ज्यासपीठावर ज्येष्ठ समाजसेवक व माजी आमदार गिरीश गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, कवी कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंकज चांदे, पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण निनावे, दत्ता मेघे अभिमत वैद्यकीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वेदप्रकाश मिश्रा, डॉ. बाबासाहेब स्मारक समितीचे सचिव सदानंद फुलझेले, रा.तु.म. नागपूर विद्यापीठाचे 'वित्त व लेखा' अधिकारी पुरण मेश्राम, सहाय्यक कुलसचिव अनिल हिरेखण, नगरसेवक प्रकाश गजभिये होते.

संस्कृतीचे संविधान की, संविधानाची संस्कृती, हे आपल्याला ठरवायचे आहे. भारतात संविधानाची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत आहे, हे डॉ. जाधव यांच्या कर्तृत्वाने सिद्ध झाले आहे, असे मत डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी व्यक्त केले.

विद्यापीठात होणाऱ्या घोषणा आणि त्यांची अंमलबजावणी, यात फारच तफावत असते. हे तपासून बघण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता विद्यापीठाचे लेखापरीक्षण व्हायला हवे, असे प्रतिपादन गिरीश गांधी यांनी केले.

पुढच्या पिढीला देशाची संस्कृती माहिती व्हावी म्हणून योजना आयोगाने भाषा आणि संस्कृती याचा विचार करावा, अशी सूचना डॉ. पंकज चांदे यांनी केली. यावेळी डॉ. नितीन राऊत यांनाही त्यांचे विचार व्यक्त केले. प्रास्ताविक पुरण मेश्राम यांनी केले. ■

NEWS PAPER CLIPINGS

Name of News paper : Loksatta

Dated : December 6, 2009

तरुणाई देशाचे बलस्थान - डॉ.जाधव

नागपूर, दि.५ (प्रतिनिधी) - महासत्तेचे स्वप्न दिवास्वप्न ठरायचे नसेल तर शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करावा लागेल. सोबतच देशाचे बलस्थान असलेली तरुणाई अधिक सक्षम आणि प्रगत कशी होईल, याचे नियोजन करण्याची हीच खरी संधी असल्याचे प्रतिपादन केंद्रीय योजना आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

शहरातील विविध सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांच्यावतीने डॉ.जाधव यांचा नागरी सत्कार शनिवारी डॉ.आंबेडकर महाविद्यालयात करण्यात आला. यावेळी 'सामाजिक व आर्थिक न्यायात उच्च शिक्षणाची भूमिका' या विषयावर ते बोलत होते.

पशुविज्ञान, मत्स्य व दुग्धविकास मंत्री डॉ. नितीन राऊत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सचिव सदानंद फुलझेले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.श.नु.पठाण, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.पंकज चांदे, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण निनावे, दत्ता मेघे अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वेदप्रकाश मिश्रा, वनराईचे विश्वस्त गिरीश गांधी आणि नगरसेवक प्रकाश गजभिये यावेळी उपस्थित होते.

डॉ.जाधव म्हणाले, २०२० ला भारताचे सरासरी वयोमान २८ इतके असेल. त्या तुलनेत प्रगत देशाचे सरासरी वयोमान ३५ वर पोहोचणार आहे. आताच्या प्रगत देशांनी त्यांच्याकडील तरुणाईचा विकास करीत प्रगतीची कास धरली. ती संधी आता आपल्याकडे आहे. त्यामुळे महासत्तेचे ध्येय गाठण्यासाठी सध्या १२ टक्क्यावर असलेला उच्च शिक्षणाचा दर कसा वाढेल, यावर नियोजन करण्याची गरज आहे.

११ व्या पंचवार्षिक योजनेत याकडे कटाक्ष टाकण्यात आल्याचे जाधव यांनी सांगितले. पुस्तक आणि गाईड वाचून तीन तासाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना आयुष्याची परीक्षा पास करण्यासाठी काय देता येईल यावर लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमांची मांडणी करून त्याचा अधिकाधिक विद्यार्थ्यांना फायदा करून देण्यासाठी विद्यापीठांनी पुढे येण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

देशात रोजगार हमी योजनेची मुहूर्तमेढ रोवणारा महाराष्ट्र मात्र ही योजना राबविता कमी पडतो, याबद्दल डॉ.जाधव खंत व्यक्त केली.

नागपूर विद्यापीठाला केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा देण्यासाठी डॉ.जाधव यांनी प्रयत्न करावे, अशी विनंती कुलगुरू डॉ.पठाण यांनी यावेळी केली. डॉ.चांदे म्हणाले, तंत्रज्ञान आणि विज्ञानच्या बळावर देशाने महासत्तेकडे वाटचाल सुरू केली असली तरी भारतीय संस्कृती आणि तत्वज्ञानाच्या बळावर नेतृत्व करणे शक्य आहे. वित्त व लेखा अधिकारी पुरण मेश्राम यांनी प्रास्ताविकातून डॉ.जाधव यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. संचालन सहायक कुलसचिव अनिल हिरेखन यांनी केले.

डॉ.नरेंद्र जाधव यांचा सत्कार करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सचिव सदानंद फुलझेले. सोबत ना.डॉ.नितीन राऊत, कुलगुरू डॉ.वेदप्रकाश मिश्रा, डॉ.एस.एन.पठाण, डॉ.पंकज चांदे.